रे.मु.नं.०३/२००९
संजय वि. पांडुरंग

**<u>आदेश नि.क्र.७९</u>**

सदर अर्ज वादी क्र.—१ तर्फे वारस दाव्यामध्ये घेणेकामी दिलेल्या अर्जात दुरूस्ती करण्यासाठी आहे.

२. अर्ज, म्हणणे, व प्रकरणाचे अवलोकन केले. दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकला.

३. अर्जदार वादीचे थोडकयात म्हणणे असे की, दाव्यामध्ये नि. क्र.६९ व ७१ मध्ये प्रतिवादी क्र.२ ऐवजी अनावधानाने प्रतिवादी क्र.३ असा चुकीचा उल्लेख केलेला आहे. मृत्युचा दाखला प्रतिवादी क्र.२ चा आहे. अर्ज नि.६९ व ७१ मध्ये प्रतिवादी क्र.३ चे नावाचा उल्लेख असल्याने त्यावरील आदेशात देखील प्रतिवादी क्र.३ चाच उल्लेख झालेला आहे. सदर चूक तांत्रिक व टंकलेखनाच्या दोषामुळे झालेली आहे. प्रतिवादी क्र.२ चे वारस दाव्यात घ्यावयाची परवानगी मिळणे आवश्यक आहे, शेवटी प्रतिवादी क्र.३(१) ते ३(६) ऐवजी २(१) ते २(६) अशाप्रकारे झालेल्या आदेशात दुरूस्ती आदेशाची विनंती केलेली आहे.

४. समोरील बाजूचे थोडकयात म्हणणे असे की, अर्जातील कारण खरे नाही. वादी हेतुपरस्कर कामकाज लांबवित आहे. प्रकरण जुने असून दि. ०४.०२.२०१९ रोजीचा आदेश असून तजविज केलेली नाही, शेवटी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

५. अर्ज नि.क्र.६९ व ७१ मयत प्रतिवादीचे वारस दाव्यात समाविष्ट करण्याकरिता होते. अर्ज नि.६९ मध्ये मयत प्रतिवादी म्हणून त्र्यंबक गणपत शेवाळे याचे नावाचा उल्लेख आहे परंतु प्रतिवादी क्र.२ ऐवजी प्रतिवादी क्र.३ असा उल्लेख केलेला आहे. प्रतिवादी क्र.२ हाच मयत असून प्रतिवादी क्र.३ मयत नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ चे वारस हेच दाव्यात समाविष्ट करणे आवश्यक आहेत. मयत त्र्यंबक याचे वारसांना दाव्यात समाविष्ट करण्याची परवानगी दिलेली आहे परंतु वादीस वारसांची

नावे प्रतिवादी क्र.३(१) ते ३(६) असे नमुद करण्याचे आदेशित केलेले आहे. प्रतिवादी क्र.३ हयात असल्यामुळे व प्रतिवादी क्र.२ मयत असल्यामुळे प्रतिवादी क्र.२ चे वारसाचे नावे यांची प्रतिवादी क्र.२(१) ते २(६) अशा प्रकारे दुरूस्ती करणे आवश्यक आहे.

६. पूर्वीचे आदेश झाल्यानंतर सदर अर्ज खूप विलंबाने दिलेला आहे. खटला जवळपास दहा वर्ष जुना आहे. झालेली चूक ही तांत्रिक बाबीमध्ये मोडते व दाव्याचा योग्यप्रकारे निकाल लावण्यासाठी समोरील बाजूस भरीव खर्च देणेवर योग्यप्रकारे दुरूस्ती होणे आवश्यक आहे, करिता खालील आदेश.

## **आदेश**

अर्ज खालील प्रमाणे मंजूर करण्यात येतो —

१. प्रतिवादी क्र.२ त्र्यंबक गणपत शेवाळे याचे वारस म्हणून नि.क्र.७१ अर्जातील वारसांना प्रतिवादी क्र.२(१) ते २(६) अशा प्रकारे दुरूस्तीस खर्चाच्या पुर्ततेवर परवानगी देण्यात येते.

२. खर्च म्हणून वादीने प्रतिवादींना रू.६५०/—(सहाशे पन्नास मात्र) देण्यात यावेत.

३. खर्च पुढील तारीख अथवा त्यापूर्वी देण्यात येवून दाव्यात दुरूस्ती करण्यात यावी व दुरूस्त दाव्याच्या आवश्यक प्रती दाखल करण्यात याव्यात.

सही/—

दि. ०८/०७/२०१९

(श.गि.दुबाले)

दि.न्या.क.स्तर, नांदगाव.